# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीद्वारे केलेल्या पिकनिहाय संशोधन शिफारसी/तंत्रज्ञान (२००९ ते २०१८)

| पिकाचे नांव : फुले | | |
|---|---|---|
| **लागवडी विषयी तंत्रज्ञान व शिफारसी :** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| २०११ | १ | निशीगंधाच्या फुलदांडे व कंदाच्या किफायतशीर उत्पादनासाठी निशिगंधाचे कंद जीए-३ (१२५ पी.पी.एम.) द्रावणामध्ये २४ तास बुडवून लागवडीची शिफारस करण्यात येते. |
| २०१३ | १ | डाळींबाच्या यशस्वी शाखीय अभिवृध्दीकरिता पक्व फांद्याचा छाट आयबीए २५०० पीपीएम तिव्रतेच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवून ७० टक्के शेडनेट गृहात लागवड करण्याची शिफारस करण्यात येते. |
| | २ | पेरुची व्यापारीदृष्ट्या अभिवृध्दी करण्याकरिता ९-१० महिने वयाच्या खुंटावर फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मृदकाष्ठ कलम पध्दतीने कलमीकरण करण्यासाठी परिपक्व डोहे फांदी घेण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| २०१४ | १ | दर्जेदार फुलदांडा, दांडीवरील अधिक फुले, फुलदांड्यांचे कंदाच्या अधिक उत्पादनासाठी व आर्थिक फायद्यासाठी ग्लॅडीओलसची फुले "फुले गणेश" ही जात विदर्भामध्ये लागवडीकरिता शिफारस करण्यात येते. |
| २०१६ | १ | ग्लॅडीओलसच्या दर्जेदार फुलदांड्याच्या व कंदाच्या फायदेशीर उत्पादनासाठी कंदाची लागवड ३० × २५ सें.मी. अंतरावर सपाट वाफ्यामध्ये करण्याची शिफारस करण्यात येते. |
| २०१८ | १ | विदर्भ विभागात मोगरा फुलांच्या अधिक उत्पादनाकरिता आणि आर्थिक मिळकतीकरिता झाडांची डिसेंबर महिन्याच्या चौथ्या आठवड्यात मध्यम प्रमाणात (जमिनीपासून ३० सें.मी. उंचीवर) छाटणी करण्याची शिफारस करण्यात येते. |
| **खत व्यवस्थापनाबद्यल शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| २०१० | १ | ग्लॅडीओलस पिकामध्ये, नत्रयुक्त रासायनिक खताची मात्रा २५ टक्क्यानी कमी करण्याकरिता, कंदांना लागवडीपूर्वी ॲझेटोबॅक्टर आणि ॲझोस्पीरीलीयम जिवाणू खताची प्रक्रिया करावी. |
| २०१२ | १ | गेलार्डीया फुलांच्या अधिक उत्पादनाकरिता व आर्थिक फायद्यासाठी लागवडीनंतर सायकोसिल (२०० पीपीएम) या संजिवकाची ३० व ४५ दिवसांनी फवारणी करण्याची शिफारस करण्यात येते. |
| **पाणी व्यवस्थानाबद्यल शिफारसी :** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| | १ | - |
| **किड व रोग व्यवस्थापनाबद्यल शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| | १ | - |
| **काढणी पश्चात व्यवस्थापनाबद्यल शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| | १ | - |
| **पीक व्यवस्थापनाबद्यल इतर शिफारसी** | | |
| **वर्ष** | **अं.क्र.** | **शिफारस** |
| | १ | - |